नि.फौ.ख.क्र.११७/२०२४
शासन वि. अरूणा
**निशाणी क्र. २४**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी शपथेवर सुरू**

| | |
|---|---|
| माझे नाव | :- उर्मिला दिलीप कुऱ्हाडे, |
| माझे वय | :- ३० वर्षे, |
| व्यवसाय | :- घरकाम, |
| राहणार | :- झारे गल्ली, मानवत, ता. मानवत, जि. परभणी. |

---

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांचा सरतपास श्री. डी. एस. नाटकर सहा. सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत :–**

फिर्यादी माझी सासु आहे. माझ्या परिवारात मी, माझी सासु, पती, दीर व जाऊ राहतो. आमचे शेत गट क्र.६९ स्मशानभुमी, बौध्दवाडा जवळ मानवत येथे आहे. घटना ०२ वर्षापुर्वी आरोपी अरूणा कुऱ्हाडे यांच्या घरासमोर दुपारी २.४५ ते ४.०० च्या सुमारास घडली होती. आमच्या शेतात बाया कापुस वेचत होत्या. त्यांना आरोपी क्र.१ यांचा मुलगा गोविंद याने अडविले होते. त्यामुळे मी व फिर्यादी आरोपी क्र.१ च्या घरी ''आमच्या शेतातील कापूस वेचणाऱ्या बायांना का अडविले'' असे विचारण्याकरीता गेले होते. त्यावेळी आरोपी क्र.१ ने तुमचे शेत नाही, आमचे शेत आहे, असे म्हणून मला ''छिन्नाल, रांड, मोकारे, झवुन घेणाऱ्या, आमच्या शेतात आम्ही येवू देणार नाही'' अशी अश्लील शिवीगाळ केली. त्यानंतर तिथे आरोपी क्र.२ आला व तो ''शेतात आलात तर खतम करू'' असे म्हणाला. तसेच मला व फिर्यादीला शिवीगाळ केली. तसेच त्याने मला राहुलने हाताने मारले. त्यानंतर तिथे माझे पती दिलीप आले व त्यांनी भांडणाची सोडवासोडव केली. त्यानंतर आम्ही तेथून पोलीस स्टेशनला जावुन तक्रार दिली. ज्या आरोपींनी आम्हांला शिवीगाळ केली, त्यांना पाहिल्यास मी ओळखू शकते. आज रोजी ते न्यायालयासमक्ष हजर आहेत.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी क्र. १ व २ तर्फे विधीज्ञ श्री. ए. जे. काळदाते यांच्यामार्फत सुरू :–**

२) हे म्हणणे खरे आहे की, गट नंबर ६३ मध्ये आम्हाला ०२.११ एकर एतकी जमीन आहे आणि गट नंबर ६९ मध्ये निवृत्ती व उत्तम यांना प्रत्येकी ०२ एकर एतकी जमीन आहे. आम्ही आपआपली जमीन वहिती करून खातो. हे म्हणणे खरे आहे

नि.फौ.ख.क्र.११७/२०२४
शासन वि. अरूणा
**निशाणी क्र. २४**

की, माझ्या पतीची मानसिक स्थिती बरोबर नसल्याने त्यांच्यावर उपचार चालु आहेत. घटना साधारण ०१ तास चालु होती. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आजुबाजूस अनेक घरे असून समोरील रस्ता हा वर्दळीचा आहे. घटनेवेळी घटनास्थळाच्या आजुबाजूस बरेच लोक जमा झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ च्या घरापासून घटनास्थळ दिसत नाही. माझे पती दिलीप हे घटना चालु असताना घटनास्थळी आले होते. पोलीस स्टेशनला मी व फिर्यादी सोबत गेलो होतो.

३) हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटना घडलीच नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.६९ मधील जमीन उत्तम व निवृत्ती कुऱ्हाडे यांच्या नावावर असून सध्या सदर जमीन प्लॉटिंगची असून त्यांनी सदर जमीन आम्हांला देण्यास नकार दिला, म्हणून त्यांच्यावर दबाव आणण्यासाठी आम्ही आरोपींविरूध्द प्रस्तुतची खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण</u>.**
फेरतपास नाही.

श्रृ. नि. स्वि.,

Digitally signed by PRANJASVI PHATALE
Date: 2026.03.20 17:10:37 +0530

ठिकाण : मानवत
दिनांक: २०/०३/२०२६

**(श्रीमती पी. सी. फटाले)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मानवत.